


दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : २९९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.१० जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# मुंबई, ठाणे, नवी मुंबईकरांना मुख्यमंत्र्यांची मोठी भेट!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, ठाणे :** मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महत्त्वाचा मानला जाणारा ठाणे-घोडबंदर मार्गावरील गायमुख ते फाउंटन हॉटेल भुयारी मार्ग आणि फाउंटन हॉटेल ते भाईंदर उन्नत पूल प्रकल्पाला अखेर हिरवा कंदील मिळाला आहे. हे दोन्ही प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पश्चिम मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नाशिक आणि गुजरातकडे जाणारा प्रवास अधिक जलद व सुलभ होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.




मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या मंत्रालयातील बैठकीत तब्बल २२ हजार ६११ कोटी रुपयांच्या विविध प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**उपसा मिळणार घोडबंदर मार्गाला**

या प्रकल्पांतर्गत गायमुख ते फाउंटन हॉटेल दरम्यान ५.८६ किलोमीटर लांबीचा सहा पदरी भुयारी मार्ग उभारला जाणार आहे. तर फाउंटन हॉटेल ते भाईंदर दरम्यान ९.५८ किलोमीटर लांबीचा सहा पदरी उन्नत पूल उभारण्यात येणार आहे. भुयारी मार्गाचे बांधकाम अत्याधुनिक टीबीएम तंत्रज्ञानाच्या साहाय्याने करण्यात येणार असून त्याचा व्यास १४ मीटर असेल. पुढील पाच वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

**ताशी १०० किमी वेगाने धावणार वाहतूक**

वसई खाडीला समांतर उभारण्यात येणाऱ्या उन्नत पुलावर वाहनांना ताशी १०० किलोमीटर वेगाने प्रवास करता येणार आहे. त्यामुळे घोडबंदर मार्गावरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. विशेषतः ठाणे आणि गुजरातच्या दिशेने जाणाऱ्या जड वाहनांसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध होणार असल्याने प्रवासाचा वेळही मोठ्या प्रमाणात वाचणार आहे.

**सार्वजनिक-खासगी भागीदारीतून प्रकल्प**

हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या 'बांधा-वापरा-हस्तांतरित करा' (बीओटी) तत्त्वावर राबविण्यात येणार आहे. यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून व्हायबिलिटी गॅप फंडिंग देण्यात येणार आहे. तसेच प्रकल्प परिसरासाठी एमएमआरडीएला विशेष नियोजन प्राधिकरणाचा दर्जा देण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

**नवी मुंबई मेट्रो विस्तारालाही मंजुरी**

याच बैठकीत सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो मार्ग १ए (सागर संगम ते सीबीडी बेलापूर) आणि मेट्रो मार्ग २ (पेंधर ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टी-४) विस्तार प्रकल्पांनाही मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे सागर संगम ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा सलग २८ किलोमीटरचा मेट्रो मार्ग उपलब्ध होणार आहे.

या विस्तारामध्ये मार्ग १ए वर दोन तर मार्ग २ वर ११ स्थानकांचा समावेश आहे. भविष्यात दररोज सुमारे १२ लाख प्रवासी या मेट्रो सेवेचा लाभ घेतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे नवी मुंबईतील सार्वजनिक वाहतुकीला मोठी चालना मिळणार असून विमानतळाशी जोडणीही अधिक सक्षम होणार आहे.

# दुष्काळावर मात करण्यासाठी 'आम्ही टाकळीकर' एकवटले



## लोकसहभागातून बदलतोय 'टाकळी ढोकेश्वर' चा चेहरा
## आम्ही टाकळीकर राबवत आहे ग्रामविकासाची चळवळ

**– डॉ.बाळासाहेब बांडे,**
**अध्यक्ष – आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठान,**
**टाकळी ढोकेश्वर**



● टाकळी ढोकेश्वर येथिल विविध क्षेत्रात कार्यरत भूमिपुत्रांनी १२ वर्षापूर्वी एकत्र येत आम्ही टाकळीकर ही ग्रामविकासाची चळवळ सुरू केली. या माध्यमातून दरवर्षी गावाला एक नवीन ग्राम विकासाचा प्रकल्प देण्याचे निश्चित करण्यात आले. जलसंधारणाची चळवळ केवळ कागदावर न रंगवता, प्रत्येक्षात लोकसहभागातून केलेल्या विविध प्रकल्पांमुळे आम्ही टाकळीकर समूहाला टाकळी ढोकेश्वरचे चित्र बदलण्यात यश आले आहे. जलशुद्धीकरण प्रकल्प, ऐतिहासिक बारव सुरक्षा, बारव कारंजा सुशोभीकरण, जिल्हा परिषद शाळा सुशोभीकरण, जलसंधारण पहिला टप्पा, ग्रामविमा संरक्षण, सौरऊर्जा प्रकल्प, सर्व शाळांचे डिजिटलायझेशन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, मराठी शाळा सभागृह सुशोभीकरण, अमरधाम सुशोभीकरण, महाविद्यालय वृक्ष संवर्धन, अमरधाम शौचालय, विद्यालय शौचालय, मराठी शाळा शौचालय प्रकल्प, तर आता जलसंधारणाची कामाचा दुसरा पप्पा राबविला जात आहे.

**– जेष्ठ पत्रकार चाँद शेख,**
**सचिव – आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठान,**
**टाकळी ढोकेश्वर**



● आज एकीकडे व्हॉट्स अप, फेसबुक हा सोशल मीडिया केवळ शब्दांचे बाण हवेत फेकून तरुणांची माथी भडकविण्याचे माध्यम बनत आहे. हे केवळ टाईमपासचे माध्यम आहे. असा समजात ग्रह बनत असताना याच माध्यमांचा माहितीची देवाणघेवाण व आपल्या मातृभूमीशी नाळ जोडण्यासाठी वापरत गावात विविध विकास प्रकल्प सुरू करण्यासाठी आम्ही टाकळीकर ह्या ग्रुप तयार केला आहे. या ग्रुपचे स्वतः चे संकेतस्थळ असून त्या माध्यमातून या कामांची माहिती जगभर पोहचत आहे. अनेक गावांतील तरुण प्रेरणा घेऊन असे प्रकल्प सुरू करत आहे हे या ग्रुपचे सर्वात मोठे यश आहे. आम्ही टाकळीकरच्या माध्यमातून होणाऱ्या विकास कामांमधून इतर गावांतील तरुणांनी प्रेरणा घ्यावी व आपल्या गावचा विकास करावा. तसे झाले तर एक विकासाची चळवळ उभी राहिल,हा या ग्रुपचा खरा हेतू आहे.

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** कोणत्याही गावाला दुष्काळमुक्तीच्या शिखरावर पोहचण्यासाठी कमीत कमी २५ ते ३० वर्षांचा कालावधी लागण्याचा अनुभव आहे. पारनेर म्हटले की दुष्काळ डोळ्यासमोर उभा राहतो. अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या टाकळी ढोकेश्वर या गावातील विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजवत असलेल्या भूमिपुत्रांनी एकत्र येत ग्राम विकासाची चळवळ सुरू केली.

एक तप म्हणजे बारा वर्षापूर्वी व्हॉट्सॲप या सोशल मीडियाच्या माध्यमातून आम्ही टाकळीकर या ग्रुपची निर्मीती करण्यात आली. आणि पुढे त्याचा समूह तयार झाला आणि बारा वर्षात या समूहाने लोकसहभागातून छोटे - मोठे तब्बल १६ सामाजिक प्रकल्प गावासाठी राबवून किमया केली आहे. दरवर्षी किमान एक प्रकल्प राबविण्याचा या समूहाचा मानस आहे.

फेब्रुवारी, मार्च महिन्यापासून पावसाळ्यापर्यंत गावाला नेहमीच पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. दरवर्षी उन्हाळ्यात गावाला पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागते, अशी परिस्थिती असल्याने यावर मात करण्यासाठी

टाकळी ढोकेश्वर गावचे सुपुत्र पत्रकार चाँद शेख यांनी पुढाकार घेऊन गावातील विविध समस्या टाकळी ढोकेश्वर गावातील पाण्याचे पुनरूज्जीवन प्राप्त करायला हवे असे वाटू लागले. त्यांनी मनातील भावना आपल्या गावातील भूमिपुत्र आणि पुणेस्थित आरोग्य क्षेत्रात पुण्यासारख्या ठिकाणी सर्वसामान्य माणसांना आधार असणारे ख्यातनाम नोबेल मेडिकल फाऊंडेशनचे वरिष्ठ सल्लागार डॉ. बाळासाहेब बांडे यांच्याकडे व्यक्त केल्या.

पत्रकार चाँद शेख यांनी ग्राम विकासाला हातभार लावणारी सामाजिक कार्यकर्त्यांची भावी पिढी घडवी, यासाठी त्यांनी कंबर कसली. डॉ बाळासाहेब बांडे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानची स्थापना करून १४ जानेवारी २०१४ रोजी मकर स्क्रांतीच्या दिवशी आम्ही टाकळीकर हा समूह पत्रकार चाँद शेख यांनी तयार केला.

डॉ. बांडे व पत्रकार चाँद शेख यांनी गावच्या ग्रामसभेत गावाच्या पाण्याचे पुनरूज्जीवन मिळवण्याची कल्पना मांडली. पाणी टंचाईवर मात करण्यासाठी चर्चा घडवून आणली. यावर सकारात्मक सूर आल्याने जलविकासाच्या कामात राजकारण आणायचे नाही हा विश्वास सर्वांनी स्वीकारला.

आरोग्य क्षेत्रात पुण्यासारख्या ठिकाणी सर्वसामान्य माणसांना आधार असणारे डॉ. बाळासाहेब बांडे यांनी या समूहाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली आणि या चळवळीचा प्रवास सुरू झाला. जलशुद्धीकरण, जलसंधारण, सार्वजनिक शौचालय, मातृ शाळा असणाऱ्या जिल्हा परिषद शाळेचे आधुनिकीकरण असे विविध लोकपयोगी प्रकल्प या समूहाने लोकवर्गणी, जलसाक्षरता, नियोजन,व्यवस्थापन लोकसहभाग आणि काटकसरीने वापर करून राबविले. सुमारे ४७ लाख रुपयांचे काम या समूहाने लोक वर्गणीतून केले आहे. शिवाय कामे करताना कोणत्याही कामांमध्ये स्वार्थ येऊ दिला नाही.

सध्या जलसंधारण काम या समूहाने नाम फाऊंडेशन व सकाळ रिलीफ फंड या माध्यमातून सुरू केले आहे. आतापर्यंत दोन लाख रुपये देणगी जमा झाली असून अजूनही मदतीचा ओघ सुरूच आहे. दशक्रिया विधी घाट ते धुमाळ वस्ती या दोन किलोमीटर ओढ्याचे खोलीकरण व विस्तारीकरण केले असून सध्या निवडुंगेवाडी तलावाचे खोलीकरण करून पाणी पातळी वाढविण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. भविष्यातही अनेक विकासकामे हा ग्रुप करणार आहे. हे करत असताना विविध संस्था आणि ग्रामपंचायतची मदत व ग्रामस्थ आणि स्थानिक तरुणांची मोलाची साथ मिळत आहे.

**विविध घटकांची मदत !**

सामाजिक कार्याला बळकटी द्यायची असेल तर क्रियाशील तरुण कार्यकर्त्यांची आवश्यकता असते. टाकळी ढोकेश्वर येथील जे भूमिपुत्र परदेशात व परराज्यात आहेत तेही या कामात हातभार लावतात. ज्या मुली लग्न होऊन सासरी गेल्या आहेत त्या गावच्या अर्थात माहेरच्या ओढीतून या कामाला हातभार लावतात. पहिल्या प्रकल्पा पासून आतापर्यंत प्रत्येक प्रकल्पात ग्रामस्थांनी लोक वर्गणी देऊन या कामांना हातभार लावला आहे.

# पेण पोलिसांची धडाकेबाज कामगिरी; २४ तासांत खुनाचा उलगडा




**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०९, पेण :** पेण तालुक्यातील शितोळेवाडी परिसरात घडलेल्या महिलेच्या खुनाच्या प्रकरणाचा छडा लावत पेण पोलिसांनी अवघ्या २४ तासांत दोन आरोपींना अटक केली आहे. या कामगिरीमुळे पोलिसांच्या तपास पथकाचे सर्वत्र कौतुक होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ८ जून रोजी शितोळेवाडी गावाच्या हद्दीत मुंबई-गोवा महामार्गालगत वनविभागाच्या जागेत एका महिलेचा मृतदेह आढळून आला होता. मृत महिलेची ओळख अंबी जान्या जाधव अशी झाली. तिच्या चेहऱ्यावर मारहाण करून तसेच गळा दाबून हत्या करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले होते. या गंभीर गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी घटनास्थळी मिळालेल्या मोबाईलच्या तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेत आरोपींचा माग काढला. तपासादरम्यान रामअवतार उर्फ शेरा रामविश्वास केवत (मध्य प्रदेश, सध्या मुंगोशी क्रेशर, ता. पेण) आणि त्याचा साथीदार सुनील मोतीलाल विश्वकर्मा (मध्य प्रदेश) यांचा गुन्ह्यात सहभाग उघड झाला. पोलिसांनी दोघांनाही ९ जून रोजी अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या नेतृत्वाखालील तपास पथकाने ही यशस्वी कामगिरी बजावली.

# ५ जिगरी मित्रांचा वर्धा नदीत बुडून दुर्दैवी मृत्यू



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, घुग्घुस (चंद्रपूर) :** सोमवारचा दिवस घुग्घुस शहरासाठी काळाकुट्ट ठरला. इंदिरा नगर येथील पाच जिगरी मित्र आनंदात घराबाहेर पडले, मात्र कोणालाही कल्पना नव्हती की ही त्यांची शेवटची भेट ठरेल. वर्धा नदीच्या बेलोरा घाटावर अंघोळीसाठी गेलेल्या या पाच युवकांचा दुर्दैवी बुडून मृत्यू झाला, आणि क्षणार्धात पाच कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला.


या हृदयद्रावक घटनेत तन्मय पथाडे (१८), संनी असमपेली (१९), सम्यक सोनटक्के (१८), रोहित बोबडे (१९) आणि नकुल केलझरकर (१८) या युवकांचा समावेश आहे. सोमवारी दुपारी हे सर्व मित्र घरातून बाहेर पडले होते, मात्र त्यांनी नदीवर जात असल्याची माहिती कुटुंबियांना दिली नव्हती. संध्याकाळपर्यंत घरी न परतल्याने कुटुंबियांची चिंता वाढली. मोबाईलवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता सर्वांचे फोन बंद आढळले. नातेवाईकांनी शोध सुरू केला असता काहींनी त्यांना वर्धा नदीकडे जाताना पाहिल्याचे सांगितले. यानंतर बेलोरा घाटावर पोहोचलेल्या कुटुंबियांना किनाऱ्यावर पडलेले कपडे, मोबाईल व चप्पल पाहून धक्का बसला. अनर्थाची चाहूल लागताच परिसरात एकच हळहळ पसरली.

घटनेची माहिती मिळताच घुग्घुस पोलीस घटनास्थळी दाखल झाले. चंद्रपूर येथून बोट व शोध पथकाला पाचारण करण्यात आले. रात्री उशिरापर्यंत शोधमोहीम सुरू होती, मात्र अंधारामुळे ती थांबवावी लागली. मंगळवारी सकाळी पुन्हा शोधमोहीम सुरू करण्यात आली. सकाळी सुमारे सात वाजता इंटेक वेलजवळ तन्मय पाथडे याचा मृतदेह आढळला. त्यानंतर दोन तासांत नकुल केलजलकर व सनी असमपेली यांचे मृतदेह सापडले. पुढे रोहित बोबडे व शेवटी दुपारी सुमारास समय सोनटक्के याचा मृतदेहही सापडला. पाचही मृतदेह इंटेक वेल परिसरात आढळले.

एकाच वेळी पाच युवकांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण घुग्घुस शहरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.




## जागतिक नेत्रदान दिन



आज १० जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. अनेक अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करणारे सुप्रसिद्ध नेत्र विशारद डॉ. रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिवस जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. डोळ्यात दाटलेल्या काळ्याकुट्ट अंधारातून उद्याच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या व्यक्तींना नेत्रदानाच्या माध्यमातून हे जग सुंदर आहे याची प्रचिती देण्याची प्रेरणा हा दिवस आहे. शासकीय सेवेत नेत्रचिकित्सक म्हणून अहोरात्र झटणाऱ्या डॉ भालचंद्र यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे. त्यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यात १० जून १९२४ रोजी झाला.

घरची परिस्थिती हलाखीची असूनही जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी शिक्षण पूर्ण करून नेत्र विशारद पदवी मिळवून ८० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या. १० जून १९७९ ला त्यांचे निधन झाले. या दिवसाचे औचित्य साधून लोकांमध्ये नेत्रदानाविषयी जनजागृती करून लोकांना मृत्यूनंतर डोळे दान करण्यास प्रवृत्त करणे हे या दिवसाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. आपल्या आयुष्यात डोळ्यांचे किती महत्व आहे हे आपण जाणतोच. जगातील सर्व सुंदर गोष्टी आणि सुंदर जगाचा आनंद आपण डोळ्यांमुळेच घेऊ शकतो. डोळ्यांशीवाय जगण्याची कल्पनाही कोणी करू शकत नाही. डोळे हे आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचे ज्ञानेंद्रिय आहे. डोळ्यांद्वारे आपल्याला ७५ टक्के ज्ञान मिळते. सध्याचा काळात बदलणारी जीवनशैली, अनियमित दिनचर्या, प्रदूषण आणि वाढलेला मानसिक तणाव यामुळे बहुतेक लोकांना डोळ्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. काहींना हा त्रास लहानवयातच होतो तर काहींना वयाच्या मध्यकाळात होतो. काही असेही दुर्दैवी असतात की ज्यांच्या आयुष्यात कायमचा अंधार असतो. त्यांना दृष्टीच नसते. जन्मतःच ते दृष्टिहीन असतात. तर काही जण अपघातात आपले डोळे गमावतात. जगभरात दृष्टिहीन लोकांची संख्या जास्त आहे. अशा अंधारलेल्या लोकांच्या आयुष्यात नेत्रदानाने प्रकाश आणता येतो. त्यासाठी नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊन जग न पाहिलेल्या व्यक्तींना नेत्रदान करुन त्यांना हे सुंदर जग पाहण्याची संधी देणे ही काळाची गरज आहे. भारतामध्ये असलेल्या कायद्यानुसार नेत्रदान हे मरणोत्तर करावे. हे नेत्रदान चष्मा असणारे, मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेले तसेच मधुमेह आणि मानसिक त्रास असलेले व्यक्तीही करू शकतात. नेत्रदान करण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींनी जवळच्या नेत्रपेढीत जाऊन नेत्रदानाची नोंद करावी. मृत व्यक्तीने नेत्रदानाची नोंद केली नसली तरी त्या व्यक्तीच्या वारसदारांनी इच्छा व्यक्त केली तरी त्या व्यक्तीचे नेत्रदान होऊ शकते. मृत्यूनंतर जास्तीतजास्त सहा तासाच्या आत नेत्रदान होऊ शकते. ज्या व्यक्तीला नेत्रदानासाठी कॉर्नियाचा वापर करायचा आहे त्याला चोवीस तासाच्या आत कॉर्नियाचे प्रत्यारोपण करणे गरजेचे असते. नेत्रदानाचा अर्थ शरीरातून संपूर्ण डोळा काढून घेणे असा होत नाही. यात मृत व्यक्तीच्या डोळ्याचा कॉर्नियाचा वापर करण्यात येतो. एका मृत्यू झालेल्या व्यक्तीचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येते त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे जीवन तर प्रकाशमान होतेच पण मृत व्यक्ती मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहू शकते. आज जागतिक नेत्रदानाच्या दिवशी नेत्रदानाचा संकल्प करूया, मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहूया.

**– श्याम ठाणेदार**

# येणारा काळ अविवाहितांचे युग ठरणार आहे का?



**- प्रविण बागडे**
**नागपूर**
**मो.९९२३६२०९१९**




भारतीय समाज एका शांत पण अत्यंत गंभीर सामाजिक परिवर्तनाच्या उंबरठ्यावर उभा आहे. हे परिवर्तन ना एखाद्या राजकीय क्रांतीचे आहे, ना आर्थिक उलथापालथीचे, ते आहे बदलत्या कौटुंबिक आणि वैवाहिक मूल्यांचे. एकेकाळी आयुष्याचा अविभाज्य भाग मानला जाणारा विवाह आज अनेक तरुण-तरुणींसाठी पर्याय बनत चालला आहे. शिक्षण, करिअर, आर्थिक स्वावलंबन, शहरीकरण आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांच्या वाढत्या प्रभावामुळे विवाहाचे वय सातत्याने पुढे ढकलले जात आहे. काही जण विवाह न करण्याचाही निर्णय घेत आहेत. त्यामुळे एक प्रश्न आज समाजासमोर उभा ठाकला आहे, येणारा काळ अविवाहितांचे युग ठरणार आहे का? भारतीय समाजव्यवस्थेत विवाह ही केवळ दोन व्यक्तींची वैयक्तिक बाब मानली जात नाही तर तो कुटुंब, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक स्थैर्याचा आधारस्तंभ समजला जातो. शतकानुशतके विवाहसंस्थेने समाजाला एक दिशा दिली, नातेसंबंधांची वीण घट्ट केली आणि पुढील पिढ्यांच्या निर्मितीचा पाया घातला. मात्र आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात विवाहाबद्दलच्या संकल्पना झपाट्याने बदलताना दिसत आहेत.

आजच्या पिढीची जीवनशैली आणि विचारसरणी पूर्वीच्या पिढीपेक्षा पूर्णतः वेगळी आहे. एकेकाळी वीस ते पंचवीस वर्षांच्या वयोगटात विवाह होणे सामान्य मानले जात होते. आज मात्र अनेक तरुण-तरुणी तीस वर्षांनंतरही विवाहाचा निर्णय घेत नाहीत. काही जण करिअरमध्ये स्थिर होण्याची वाट पाहतात, काही आर्थिक स्वावलंबनाला प्राधान्य देतात, तर काहींना वैवाहिक जबाबदाऱ्या स्वीकारण्यापेक्षा स्वतंत्र जीवन अधिक आकर्षक वाटते. समाजातील बदलत्या मूल्यव्यवस्थेचा हा परिणाम असला तरी त्याचे दूरगामी परिणाम दुर्लक्षित करता येणार नाहीत. शिक्षण आणि करिअरच्या स्पर्धेने विवाहाला दुय्यम स्थान दिले आहे. उच्च शिक्षणासाठी अनेक तरुण-तरुणी मोठ्या शहरांत किंवा परदेशात जातात. त्यानंतर नोकरी, बढती, व्यवसाय आणि आर्थिक प्रगती यांचा पाठपुरावा करताना विवाहाचा विषय सतत मागे पडत जातो. अनेक पालकसुद्धा आधी करिअर, मग विवाह या विचाराला प्रोत्साहन देतात. परंतु करिअरची शर्यत संपण्याचे कोणतेही निश्चित वय नसते. त्यामुळे विवाहाचा निर्णय सतत पुढे ढकलला जातो आणि नकळत आयुष्याचा महत्त्वाचा टप्पा निघून जातो.

दुसरीकडे, आर्थिक स्वावलंबनामुळे व्यक्ती अधिक आत्मनिर्भर झाली आहे. पूर्वी कुटुंब हे आर्थिक आणि सामाजिक सुरक्षेचे प्रमुख साधन होते. आज अनेकांना एकटे राहूनही चांगले जीवन जगणे शक्य झाले आहे. त्यामुळे विवाह ही गरज नसून एक पर्याय असल्याची मानसिकता वाढीस लागली आहे. विशेषतः शहरी भागात ही प्रवृत्ती अधिक स्पष्टपणे दिसून येते. मात्र या बदलांचे सामाजिक परिणामही तितकेच गंभीर आहेत. विवाहाचे वय वाढल्याने जन्मदर कमी होतो. अनेक विकसित देश आज लोकसंख्या घटण्याच्या संकटाला सामोरे जात आहेत. जपान, दक्षिण कोरिया आणि इटलीसारख्या देशांमध्ये विवाहाचे प्रमाण घटले असून वृद्धांची संख्या झपाट्याने वाढत आहे. भारताची परिस्थिती अजून तितकी गंभीर नसली तरी महानगरांमध्ये त्याची प्रारंभिक चिन्हे दिसू लागली आहेत. लहान कुटुंबे, एकुलती एक मुले आणि वाढता एकटेपणा ही त्याची काही उदाहरणे आहेत. अविवाहित राहण्याच्या वाढत्या प्रवृत्तीमुळे कौटुंबिक रचनेवरही परिणाम होतो. संयुक्त कुटुंब व्यवस्था आधीच कमकुवत झाली आहे. त्यात विवाह उशिरा होणे किंवा न होणे यामुळे कुटुंबसंस्थेची परंपरागत रचना अधिकच ढासळू शकते. वृद्ध पालकांच्या आधाराचा प्रश्न निर्माण होतो. अनेक कुटुंबांत मुलगा किंवा मुलगी अविवाहित राहिल्यास पुढील पिढीची साखळीच तुटते. यामुळे सामाजिक नातेसंबंधांचे जाळे हळूहळू कमकुवत होत जाते.

याचा अर्थ असा नाही की विवाह न करणारे सर्वच लोक चुकीचे आहेत. प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवनाविषयी निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. काही जण जाणीवपूर्वक अविवाहित राहण्याचा निर्णय घेतात आणि त्यात समाधानीही असतात. काहींसाठी विवाह योग्य पर्याय नसू शकतो. त्यामुळे विवाहाला सक्तीचे स्वरूप देणे किंवा अविवाहित राहणाऱ्यांना दोष देणे योग्य ठरणार नाही. प्रश्न व्यक्तिस्वातंत्र्याचा नसून सामाजिक संतुलनाचा आहे. खरे तर समस्या विवाह उशिरा होण्यात नाही, तर जीवनातील प्राधान्यक्रमांच्या असंतुलनात आहे. करिअर, पैसा आणि प्रतिष्ठा महत्त्वाची आहेतच, पण त्याचवेळी नातेसंबंध, कुटुंब आणि भावनिक आधारही तितकाच महत्त्वाचा आहे. आधुनिक जीवनशैलीत अनेकांना व्यावसायिक यश मिळते, पण वैयक्तिक आयुष्यात एकटेपणाची पोकळी जाणवते. सोशल मीडियावर हजारो मित्र असले तरी संकटाच्या वेळी सोबत उभे राहणारे काहीच लोक असतात. कुटुंब ही त्या अर्थाने केवळ सामाजिक संस्था नसून भावनिक सुरक्षेची जागा आहे.

पालकांची भूमिकाही येथे महत्त्वाची ठरते. अनेक पालक आपल्या मुलांकडून अत्यधिक अपेक्षा ठेवतात. शिक्षण, नोकरी, घर, गाडी आणि आर्थिक स्थैर्य या सर्व गोष्टी पूर्ण झाल्यानंतरच विवाहाचा विचार करावा, असा आग्रह धरला जातो. परिणामी विवाहासाठी योग्य काळ निघून जातो. मुलांच्या आयुष्याविषयी निर्णय घेताना त्यांच्या भावनिक आणि सामाजिक गरजांचाही विचार होणे आवश्यक आहे. समाजानेही बदलत्या वास्तवाला समजून घेण्याची गरज आहे. आजची पिढी पूर्वीच्या पिढीसारखी विचार करणार नाही, हे स्वीकारावे लागेल. विवाहाबाबत संवाद अधिक खुला आणि समंजस असला पाहिजे. विवाह म्हणजे केवळ सामाजिक दबाव किंवा परंपरेचे पालन नसून परस्पर आदर, जबाबदारी आणि सहजीवनाची तयारी आहे, हे तरुणांना पटवून सांगावे लागेल.

भारतासारख्या देशात कुटुंबसंस्था अजूनही सामाजिक जीवनाचा कणा आहे. त्यामुळे विवाहसंस्थेचे महत्त्व पूर्णपणे संपुष्टात येईल, असे म्हणणे घाईचे ठरेल. मात्र विवाहाचे वय वाढणे, अविवाहित राहण्याची प्रवृत्ती वाढणे आणि जन्मदरात घट होणे ही वास्तवातील चिन्हे आहेत. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. शेवटी प्रश्न एवढाच आहे की, आपण आधुनिकतेच्या नावाखाली नातेसंबंधांचे महत्त्व विसरत तर नाही ना? करिअर, पैसा आणि यश यांच्यामागे धावताना कुटुंबाच्या उबदार सावलीपासून दूर तर जात नाही ना? समाजाची खरी ताकद केवळ अर्थव्यवस्थेत नसते तर ती कुटुंब, संस्कार आणि परस्पर आधाराच्या नात्यांत असते. जर पुढील पिढीने विवाहसंस्थेकडे केवळ ओझे किंवा बंधन म्हणून पाहण्यास सुरुवात केली, तर त्याचे परिणाम केवळ वैयक्तिक पातळीवर नव्हे तर संपूर्ण समाजरचनेवर होतील. म्हणूनच आज गरज आहे ती संतुलित विचारांची, समंजस निर्णयांची आणि नातेसंबंधांच्या पुनर्मूल्यांकनाची. कारण विकासाची खरी व्याख्या केवळ आर्थिक समृद्धी नसून मजबूत कुटुंबे, सुदृढ नातेसंबंध आणि भावनिकदृष्ट्या समृद्ध समाज हीच आहे. येणारा काळ अविवाहितांचे युग ठरेल की नाही हे भविष्य ठरवेल, पण कुटुंबसंस्था, विवाह आणि मानवी नातेसंबंधांचे महत्त्व कधीच संपणार नाही, हे तितकेच खरे आहे.

## सार्थ दृष्टी

सर्वोत्तम दृष्टी दान
जीवन करी सार्थक
सोपी सरळ साधना
संतुष्ट होई साधक

दानधर्म ही संस्कृती
माणूसकीचे द्योतक
नकळत पुण्य कर्म
निर्मुलन हो पातक

नेत्र हीन वाट पाही
होऊन जणू चातक
येईल दाता विधाता
संकटमोक्ष स्नातक

नाव नोंदणी आधी
सुखे हसेलं मस्तक
पुण्य नोंद आपसूक
भरेलं प्रगती पुस्तक

संस्थेला कळवायचे
होता कुणी रे मृतक
सत्कर्म साधनेसाठी
दूर सारायचे सुतक

प्रकाश तिमीर देशी
उजागर होई अंधक
अक्षा सहीत प्रयाण
करेल शरीर लुब्धक

नवीनदृष्टी नवीसृष्टी
जगा अनेक शतक
नवे रूप सु स्वरूप
जणूं जनले जातक

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# महायुती सरकार सनातन धर्माचा पुरस्कार करणारे : मुख्यमंत्री फडणवीस



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०९, डोंबिवली (ठाणे) :** महायुती सरकार हे सनातन धर्माचा पुरस्कार करणारे आहे. त्यामुळे पिंपळेश्वर महादेव मंदिरासह ठाणे जिल्ह्यातील धार्मिक स्थळांच्या विकासासाठी सरकार कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी डोंबिवलीत केले. पिंपळेश्वर महादेव मंदिराच्या ४ एकर २५ गुंठे जमिनीचा सुरू असलेला संघर्ष यानिमित्ताने संपला असल्याची घोषणा फडणवीस यांनी केली.

येथील महादेव मंदिराची विधिवत पूजा करण्यासाठी मुख्यमंत्री डोंबिवलीत आले होते. त्यांच्यासोबत भाजपचे प्रदेशाध्यक्ष, आमदार रवींद्र चव्हाण, राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, आमदार सुलभा गायकवाड, आमदार किसन कथोरे, आमदार कुमार आयलानी, आमदार राजेश मोरे, माजी कॅबिनेट मंत्री जगन्नाथ पाटील, माजी आमदार सुभाष भोईर, जिल्हा अधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त अभिनव गोयल, पिंपळेश्वर मंदिराचे विश्वस्त आदी उपस्थित होते. मंदिर ट्रस्टतर्फे मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी त्यांनी आमदार रवींद्र चव्हाण यांचे कौतुक केले. २०१९ मध्येच हा प्रश्न निकाली निघाला असता. मात्र, काही राजकीय घडामोडी झाल्याने ते लांबले. परंतु चव्हाण यांनी त्याचा पाठपुरावा केला. अखेर आम्हाला कॅबिनेटमध्ये हा विषय आउट ऑफ द बॉक्स जाऊन घ्यावा लागल्याचे ते म्हणाले. चव्हाण यांनी मनोगतात २००० पासून याबाबत सुरू असलेला संघर्ष मांडला. शिळ फाट्यावरील दत्त मंदिर, श्री मलंग मुक्ती अभियान आणि जिल्ह्यातील मंदिरांसंदर्भातील प्रलंबित विषय मार्गी लावण्याची विनंती केली. त्याचा निश्चित सकारात्मक विचार होईल, असे मुख्यमंत्री म्हणाले. दळणवळण सुधारण्यासाठी पॉड टॅक्सीला ठाणे जिल्ह्यात हिरवा कंदील द्यावा, संत सावळाराम महाराज स्मारकाला निधी द्यावा, आदी मागण्या खासदार शिंदे यांनी केल्या. मंदिर ट्रस्टतर्फे पंढरी पाटील यांनी प्रास्ताविक केले.

# दिव्यात शिवसेना (उबाठा) पक्षाचे अनोखे 'गटर पूजन' आंदोलन




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०९, (दिवा) ठाणे :** दिवा शहरातील नालेसफाईची कामे अद्यापही अपूर्ण असल्याने पावसाळ्यात नागरिकांना जलतरणाचा सामना करावा लागू शकतो. ठाणे महानगरपालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने दिव्यात अनोखे 'गटर पूजन' आंदोलन करण्यात आले.

कल्याण लोकसभा संपर्कप्रमुख गुरुनाथ खोत व कल्याण जिल्हाप्रमुख अभिजीत सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली, कल्याण ग्रामीण विधानसभा उपजिल्हाप्रमुख अ‍ॅड. रोहिदास मुंडे आणि दिवा शहरप्रमुख सचिन पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. दिवा परिसरातील अनेक नाले व गटारांची सफाई अद्याप अर्धवट अवस्थेत असून, पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाणी साचण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, दिवा शहरातील नालेसफाईसाठी सुमारे १ कोटी ६० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असतानाही प्रत्यक्षात अपेक्षित कामे झालेली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. यावेळी शिवसैनिकांनी गटर पूजन करून प्रशासनाच्या निष्क्रिय कारभाराचा निषेध व्यक्त केला तसेच तातडीने संपूर्ण नालेसफाई करून नागरिकांना पावसाळ्यातील संभाव्य संकटातून दिलासा देण्याची मागणी केली. आंदोलनात पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# ठाणे क्लस्टर पुनर्विकासाला नवी गती; किसननगर आणि वागळे इस्टेट प्रकल्प आता MSRDC कडे

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०९, ठाणे :** शहरातील अनेक वर्षांपासून रखडलेल्या क्लस्टर पुनर्विकास योजनेला अखेर गती मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देश व पुढाकाराने वागळे इस्टेट, किसननगर तसेच किस्मत नगर परिसरातील क्लस्टर पुनर्विकास प्रकल्पांची जबाबदारी 'महाप्रीत'कडून काढून 'महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ' (MSRDC) कडे वर्ग करण्यात आली आहे. त्यामुळे या महत्त्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीला वेग येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे एका उच्चस्तरीय बैठकीत या संपूर्ण प्रकल्पाचा सविस्तर आढावा घेतला.



या महत्त्वपूर्ण बैठकीला उपमुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नवीन सोना, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव आणि एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासु उपस्थित होते.

प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी आणि प्रशासकीय प्रक्रियांमधील विलंब टाळण्यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या अंमलबजावणीचा व्यापक अनुभव असलेल्या MSRDC मार्फत पुनर्विकासाची कामे जलदगतीने पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

किसननगर व वागळे इस्टेट परिसरातील रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी ६० हेक्टरहून अधिक एमआयडीसीची जमीन उपलब्ध करून देण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. यामुळे पुनर्वसनासाठी आवश्यक जागेचा प्रश्न मार्गी लागून बांधकाम प्रक्रियेला चालना मिळणार आहे.

या क्लस्टर प्रकल्पांना व्हायटल पब्लिक हाऊसिंग प्रोजेक्ट अर्थात विशेष सार्वजनिक गृहनिर्माण प्रकल्पाचा दर्जा देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. त्यामुळे विविध शासकीय परवानग्या आणि मंजुरीची प्रक्रिया अधिक सुलभ होणार असून प्रकल्पातील अडथळे दूर होण्यास मदत होईल.

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात किसननगर आणि वागळे इस्टेट परिसरात ३६ ते ३७ मजली अशा एकूण ९ आधुनिक निवासी टॉवर्स उभारण्यात येणार आहेत. या इमारतींची उंची १०० मीटरपेक्षा अधिक असणार असून प्रसिद्ध वास्तुविशारद हाफीज कॉन्ट्रॅक्टर यांनी या प्रकल्पाची संकल्पना व आराखडा तयार केला आहे.

दरम्यान, रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी ट्रान्झिट कॅम्प उभारण्याच्या कामाला प्राधान्य देण्यात आले असून काही ठिकाणी पायलट प्रकल्पांतर्गत प्राथमिक पायाभूत कामांनाही सुरुवात करण्यात आली आहे. तसेच खोपट येथील सुमारे ११ एकर जागेवर क्लस्टर योजनेची अंमलबजावणी सुरू असून तेथील आगार बाळकुम येथे स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या सर्व निर्णयांमुळे ठाणे शहरातील क्लस्टर पुनर्विकास योजनेला नवी दिशा मिळणार असून हजारो कुटुंबांचे सुरक्षित, अधिकृत, आधुनिक आणि नियोजनबद्ध घराचे स्वप्न साकार होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हा ड्रीम प्रोजेक्ट लवकरच मुर्त स्वरूप धारण करेल असा आशावाद ठाणेकरांना वाटु लागल्याने त्यांच्या हक्काच्या घराच्या आशा पल्लवित झालेल्या दिसून येत आहेत.

# आरोग्य संवर्धनासाठी पुढाकार घेणारी पहिली ग्रामपंचायत ठरली खंडाळे ग्रामपंचायत

**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.०९, अलिबाग (रायगड) :** ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे आणि आजार होण्यापूर्वीच त्यांचे प्रतिबंधात्मक उपाययोजनांद्वारे संरक्षण व्हावे, या उद्देशाने अलिबाग तालुक्यातील खंडाळे ग्रामपंचायतीने एक अभिनव उपक्रम सुरू केला आहे. रायगड जिल्ह्यातील आरोग्य संवर्धनासाठी पुढाकार घेणारी पहिली ग्रामपंचायत म्हणून खंडाळे ग्रामपंचायतीची ओळख निर्माण झाली आहे. खंडाळे ग्राम पंचायतीच्या पुढाकारातून उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था व माणुसकी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने गावातील नागरिकांसाठी नियमित योगा क्लासेस तसेच आरोग्य विषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचा शुभारंभ दिनांक ८ जून २०२६ रोजी खंडाळे ग्रामपंचायत सरपंच नाशिकेत कावजी यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य प्रफुल्ल पाटील, सुशील वेळे, ग्रामसेवक बाबू चव्हाण, माजी सरपंच संतोष कनगुटकर, ज्येष्ठ नागरिक बबन पाटील, धनाजी मुंडकर, अनिल घरत, वंदना ताई, कल्याणी पाटील, विजया सुर्वे, उपेक्षा मोरे, उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्ज्वला चंदनशिव चव्हाण, माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.राजाराम हुलवान, श्रीजाई फ्युचर एलएलपीचे संचालक डॉ. नितीन गांधी, उज्ज्वल माणुसकी समन्वयक ममता म्हात्रे व उत्कर्षा गुरव, ग्रामपंचायत समन्वयक सविता ओव्हाळ, तसेच खंडाळे ग्रामपंचायत क्षेत्रातील मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी बोलताना उज्ज्वला चंदनशिव यांनी ग्रामपंचायतीने आरोग्यविषयक जनजागृती आणि प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांसाठी व योगा साठी घेतलेला पुढाकार अत्यंत कौतुकास्पद असल्याचे सांगितले.



गावातील प्रत्येक नागरिक निरोगी राहावा आणि आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारावी, यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. मार्गदर्शन करताना डॉ.नितीन गांधी म्हणाले की, आजार झाल्यानंतर उपचार घेण्यापेक्षा आजार होऊ नयेत यासाठी योग्य आहार, नियमित व्यायाम, योगा आणि आरोग्यविषयक जागरूकता यावर भर देणे आवश्यक आहे. 'उज्ज्वल माणुसकी' उपक्रमांतर्गत भविष्यात रायगड जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींमध्ये अशाच प्रकारचे आरोग्य शिबिर आणि योगा वर्ग आयोजित करण्यात येणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ममता म्हात्रे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी ग्रामसेवकांनी उपस्थित मान्यवर, ग्रामस्थ आणि आयोजकांचे आभार मानले.

खंडाळे ग्रामपंचायतीच्या या अभिनव उपक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होणार असून, हा उपक्रम ग्रामीण आरोग्य संवर्धनाच्या दृष्टीने एक आदर्श पाऊल ठरत आहे.

# मृत्यूच्या घटनेनंतरच प्रशासनाला जाग; पिंपरी फाट्यावर अखेर दुरुस्तीची लगबग

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०९, जिंतूर (परभणी) :** कोक गावाजवळील पिंपरी फाट्यावर झालेल्या भीषण अपघातात शेवडी येथील एकाच कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर अखेर प्रशासनाला जाग आली आहे. अनेक वर्षांपासून रस्त्याची दुरवस्था, खड्डे, धोकादायक वळणे आणि सुरक्षाव्यवस्थेचा अभाव याकडे स्थानिक नागरिक सातत्याने लक्ष वेधत होते. मात्र प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत असतानाच या दुर्घटनेने तीन निष्पाप जीवांचा बळी घेतला आणि त्यानंतरच यंत्रणा हलताना दिसत आहे. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी संताप व्यक्त करत रस्त्याच्या अवस्थेबाबत आवाज उठवला. प्रसारमाध्यमांनीही हा प्रश्न लावून धरल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेत रस्ता



दुरुस्तीचे काम सुरू केले आहे. जेसीबी, डंपर आणि अन्य यंत्रसामग्रीच्या सहाय्याने खडी टाकणे, रस्ता समतल करणे आणि धोकादायक ठिकाणांची दुरुस्ती करण्याची लगबग सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पिंपरी फाटा हा मागील अनेक वर्षांपासून अपघातप्रवण भाग म्हणून ओळखला जातो. येथे यापूर्वीही अनेक लहान-मोठे अपघात झाले आहेत. मात्र प्रत्येक वेळी आश्वासनांपलीकडे काहीच झाले नाही. परिणामी अखेर एका कुटुंबावर काळाने घाला घातला आणि तीन जीवांचा बळी गेल्यानंतर प्रशासनाला परिस्थितीचे गांभीर्य समजल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

नागरिकांचा संतप्त सवाल आहे की, रस्ता दुरुस्तीची ही घाई आधी का झाली नाही? तीन जीव गेल्यानंतरच प्रशासन का जागे झाले? या प्रश्नाचे उत्तर आता संबंधित विभागांनी द्यावे, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, केवळ तात्पुरती डागडुजी न करता पिंपरी फाटा परिसरात कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात, वेगमर्यादा व इशारा फलक बसवावेत, रस्त्याची गुणवत्ता सुधारावी आणि अपघात टाळण्यासाठी आवश्यक सुरक्षाव्यवस्था उभारावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

**मृत्यूचा धक्का, दुरुस्तीची घाई**

कोक गावाजवळील पिंपरी फाट्यावर झालेल्या अपघातात शेवडी येथील भगवान बळीराम काळे, कुसाबाई भगवान काळे आणि शिवम गजानन काळे या तिघांचा जागीच मृत्यू झाला होता. या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात आली. दुःखद घटनेनंतर आता रस्ता दुरुस्तीचे काम सुरू झाले असले तरी गेलेले जीव परत येणार नाहीत. त्यामुळे भविष्यात अशी दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने कायमस्वरूपी आणि प्रभावी उपाययोजना करणे हीच मृतांना खरी श्रद्धांजली ठरेल, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत. प्रशासन जागे झाले, पण तीन जीव गेल्यानंतर; हा प्रश्न जनतेच्या मनातून सहज पुसला जाणार नाही.

# महत्त्वपूर्ण एकल महिला धोरण उपक्रमात सहभागी होऊन शासनास सहकार्य करावे

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०९, नवी मुंबई :** महाराष्ट्र शासन राज्यातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी स्वतंत्र एकल महिला धोरण तयार करीत आहे. हे धोरण अधिक व्यापक, लोकाभिमुख आणि परिणामकारक व्हावे यासाठी राज्यातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, संशोधक आणि विषयतज्ज्ञ यांच्याकडून सूचना व अभिप्राय मागविण्यात येत आहेत. राज्यातील सर्व नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक व विषयतज्ज्ञ यांनी या महत्त्वपूर्ण उपक्रमात सहभागी होऊन शासनास सहकार्य करावे, असे आवाहन महिला व बाल विकास आयुक्तालय पुणे यांनी केले आहे.

एकल महिलांच्या समस्या केवळ मांडण्याऐवजी त्या समस्यांवर शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना कराव्यात, कोणत्या नवीन योजना सुरू कराव्यात, विद्यमान योजनांमध्ये कोणते बदल करावेत तसेच आवश्यक असल्यास कोणत्या कायद्यांमध्ये किंवा नियमांमध्ये सुधारणा करण्यात याव्यात याबाबत सविस्तर सूचना पाठवाव्यात.

सूचना पाठविताना केवळ त्रोटक स्वरूपातील मते न पाठविता, संबंधित विषयाची पार्श्वभूमी, अपेक्षित उपाययोजना, संभाव्य लाभार्थी आणि अपेक्षित परिणाम यांचा समावेश असलेले सविस्तर प्रस्ताव पाठवावेत. समाजातील एकल महिला तसेच सर्व संबंधित घटकांचा सक्रिय सहभाग या धोरण निर्मिती प्रक्रियेत असणे आवश्यक आहे. त्यामुळे आपल्या सूचना शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी अधिकृत व्हॉट्सअॅप क्रमांक ८२०८५८९१९५ या क्रमांकावर अभिप्राय पाठवावा.

प्राप्त होणाऱ्या सूचना व अभिप्रायांचा एकल महिला धोरणाचा मसुदा तयार करताना योग्य तो विचार करण्यात येईल.

## थोडक्यात

# हरवलेल्या वस्तू सुखरूप परत मिळवून देण्यात माथेरनकर नेहमीच पुढे, पर्यटकांमध्ये वाढतोय विश्वास



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०९, माथेरान :** पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरानमध्ये केवळ निसर्गसौंदर्यच नव्हे, तर येथील नागरिकांचा प्रामाणिकपणा देखील पर्यटकांचे मन जिंकत आहे. गेल्या काही दिवसांत माथेरानमधील विविध ठिकाणी, रिक्षा स्टॅण्ड, ई-रिक्षा तसेच सार्वजनिक ठिकाणी नागरिक व पर्यटकांकडून मोबाईल, पर्स, बॅगा, दागिने आणि इतर मौल्यवान वस्तू विसरून जाण्याच्या घटना घडल्या आहेत.

अशा वेळी ज्यांच्या हाती या वस्तू लागतात ते ई-रिक्षा चालक, घोडेमालक, दुकानदार अथवा स्थानिक नागरिक तात्काळ संबंधित माहिती माथेरानच्या विविध सोशल मीडिया ग्रुपवर प्रसारित करतात. त्यामुळे हरवलेल्या वस्तूंचा मालक शोधणे सोपे होते आणि अनेकांना त्यांचा मोबाईल, पर्स किंवा इतर मौल्यवान वस्तू सुखरूप परत मिळाल्या आहेत.

हरवलेली वस्तू परत मिळाल्यानंतर संबंधित व्यक्तींच्या चेहऱ्यावर उमटणारे समाधान आणि त्यांच्या मनातून व्यक्त होणारा कृतज्ञतेचा भाव हा या प्रामाणिक कार्याचे खरे यश ठरत आहे. कोणत्याही अपेक्षेशिवाय केवळ सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून केले जाणारे हे कार्य माथेरानच्या संस्कृतीची आणि येथील नागरिकांच्या प्रामाणिक स्वभावाची साक्ष देणारे आहे.

माथेरानमधील ई-रिक्षा चालक, घोडेमालक, दुकानदार आणि स्थानिक नागरिक यांच्या या प्रामाणिक वृत्तीमुळे पर्यटकांमध्ये विश्वास निर्माण होत असून माथेरानची एक सकारात्मक आणि वेगळी ओळख तयार होत आहे. पर्यटन क्षेत्रात विश्वास आणि सुरक्षितता हे महत्त्वाचे घटक मानले जातात. त्यामुळे माथेरानकरांचा हा प्रामाणिकपणा पर्यटकांना आकर्षित करणारा ठरत असून भविष्यात पर्यटनवाढीसाठी हातभार लावणारा ठरणार आहे. माथेरानच्या निसर्गाइतकीच येथील माणुसकी आणि प्रामाणिकता देखील जपली जावी.

"माथेरान मधे पर्यटकांची अथवा नागरिकांची चुकून एकादी मौल्यवान वस्तू मोबाईल, बेग, कोणतीही वस्तू रिक्षा स्टॅन्ड इ रिक्षात, रस्त्यावर दुकानात मिळाल्यास ती परत करून माथेरान कर आपले कर्तव्य पार पाडत असतांना कोणत्याही अमिषाला बळी न पडता ती वस्तू परत करत आहेत. ही कौतुकास्पद बाब आहे.

**- सरिता मुसळे (सहायक पोलीस निरीक्षक, माथेरान)**

# मान्सून लांबल्याने चारठाणा गावात तीव्र पाणीटंचाई



**अक्षराज : अलीम शेख**

**दि.०९, चारठाणा (परभणी) :** यंदा मान्सून उशिरा येत असल्याने चारठाणा गावात पाणीटंचाईचे गंभीर संकट निर्माण झाले आहे. गावातील ओढे, नाले, तळे आणि अनेक विहिरी जवळपास आटून गेल्या असून भूजल पातळीतही मोठी घट झाली आहे. त्यामुळे नागरिकांसह गुरेढोरे आणि वन्य प्राण्यांनाही पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

गावातील पाणीपुरवठा सुरळीत नसल्याने नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. गावात केवळ पिण्याच्या पाण्यासाठीच ८ ते १० दिवसांनी पाणी सोडले जात असल्याने दैनंदिन गरजा भागविणे कठीण झाले आहे. परिणामी अनेक कुटुंबांना खासगी टँकरद्वारे विकत पाणी घ्यावे लागत असून याचा आर्थिक भार सामान्य नागरिकांवर पडत आहे.

पाण्याच्या वाढत्या टंचाईमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून शेतकरी, पशुपालक आणि सर्वसामान्य नागरिक चिंतेत आहेत. दुसरीकडे पाण्याअभावी गुरेढोरे व अन्य वन्य प्राणी पाण्याच्या शोधात भटकताना दिसत आहेत. सध्या संपूर्ण गावाचे लक्ष आगामी मान्सूनकडे लागले असून पावसाच्या आगमनाने या संकटातून दिलासा मिळेल, अशी आशा ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. तसेच प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून नियमित पाणीपुरवठा करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# एक वर्षापासून फरार असलेला मोक्का आरोपी अखेर गुन्हे शाखेच्या ताब्यात



**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.०९, पुणे :** येरवडा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या मोक्का गुन्ह्यातील तब्बल एक वर्षापासून फरार असलेल्या आरोपीला पुणे शहर गुन्हे शाखेच्या युनिट-४ पथकाने अटक केले. या कारवाईमुळे संघटित गुन्हेगारीविरोधातील मोहिमेला बळ मिळाले असून गुन्हेगारी वर्तुळात खळबळ उडाली आहे. संबंधित गुन्ह्याचा समांतर तपास सुरू असताना पोलीस हवालदार अमदखान शेख व पोलीस हवालदार तुषार खराडे यांना गोपनीय माहिती प्राप्त झाली. फरार आरोपी कुणाल ऊर्फ सोन्या संजय चांदणे (वय २३) हा हडपसर परिसरातील गोंधळेनगर येथे वास्तव्यास असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर ही बाब वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांचन जाधव यांना कळविण्यात आली.

त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक वैभव मगदुम यांच्या समवेत पथकाने माहितीची पडताळणी करून गोंधळेनगर परिसरात सापळा रचला. ग्रीन अॅव्हेन्यू येथील निवासस्थानी छापा टाकून आरोपीला ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक चौकशीत त्याचा संबंधित मोक्का गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. सुमारे एक वर्षापासून फरार असलेल्या या आरोपीचा शोध घेण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू होते. अखेर अचूक माहिती, तांत्रिक तपास आणि नियोजनबद्ध कारवाईच्या जोरावर गुन्हे शाखेला हे यश मिळाले. आरोपीविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.